२० लाखांच्या खंडणीसाठी अभिनेत्याचे अपहरण

ओशिवरा पोलिसांत गुन्हा दाखल; तपास घाटकोपर पोलिसांकडे

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

वीस लाख रुपयांच्या खंडणीसाठी एका २९ वर्षांच्या अभिनेत्याचे अपहरण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अपहरणकर्त्यांकडून सुटका होताच या अभिनेत्याने ओशिवरा पोलिसांत तक्रार केली . या तक्रारीनंतर अपहरणकर्त्याविरुद्ध अपहरणासह खंडणीसाठी धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून या गुन्ह्यांचा पुढील तपास घाटकोपर पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या आदेशावरुन या गुन्ह्यांचा घाटकोपर पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी समांतर तपास करीत आहेत. पोर्ट ब्लेअरचा मूळचा रहिवाशी असलेला अनुशील अनुप चक्रवर्ती हा चित्रपट अभिनेता असून तो त्याच्या कुटुंबियांसोबत जोगेश्वरीतील ओशिवरा पार्क, रविकिरण अपार्टमेंटमध्ये राहतो. त्याने स्वतच्या करिअरची सुरुवात झी कंपनीच्या एका म्युझिक व्हिडीओद्वारे केली होती. त्यानंतर त्याने गेम ऑफ स्टुपिड लव्हर या चित्रपटाद्वारे प्रदार्पण केले.

दोन दिवसांपूर्वी तो घाटकोपर येथून विक्रोळीतील इस्टर्न एक्सप्रेसवरुन त्याच्या कारमधून जात होता. काही अंतर गेल्यानंतर त्याच्या कारला एका दुसऱ्या वाहनाने ओव्हरटेक केले. या वाहनातून उतरलेल्या अज्ञात व्यक्तीने त्याच्याच कारमधून त्याचे अपहरण केले होते. त्याला एका निर्जनस्थळी आणून जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर त्याच्या आईला कॉल करुन अपहरणकर्त्यांनी अनुशीलचे अपहरण झाल्याची माहिती दिली. त्याच्या सुटकेसाठी वीस लाख रुपयांची खंडणीची मागणी केली. ही रक्कम दिली नाही तर अनुशीलला सोडणार नाही, अशी धमकीही अपहरणकर्त्यांनी दिली होती.

आईला प्रचंड मानसिक धक्का

धमकीच्या कॉलचा अभिनेत्याच्या आईला प्रचंड मानसिक धक्का बसला होता. रात्री उशिरा त्याला अपहरणकर्त्यांनी सोडून दिले. घरी आल्यानंतर त्याने दुसऱ्या दिवशी म्हणजे ७ जानेवारीला ओशिवरा पोलीस ठाण्यात धाव घेतली. तिथे उपस्थित पोलिसांना घडलेला प्रकार सांगून त्याने अपहरणकर्त्याविरुद्ध तक्रार केली. या तक्रारीनंतर पोलिसांनी अपहरणकर्त्याविरुद्ध खंडणीसह अपहरण आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदविला आहे. या गुन्ह्यांचा तपास घाटकोपर पोलिसांकडे सोपविण्यात आला असून त्याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे अधिकारी करीत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका 'आप' ताकदीने लढणार : गोपाळ इटालिया

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका आम आदमी पार्टी (आप) ताकदीने लढणार आहे.यासाठी दिल्लीचे मॉडेल महाराष्ट्रात राबविणार असल्याची घोषणा आप गुजरातचे माजी अध्यक्ष, महाराष्ट्र सहप्रभारी तरुण नेते गोपाळ इटालिया यांनी रविवारी नवी मुंबईतील मेळाव्यात केली . वाशी डेपो समोरील, विष्णुदास भावे नाट्यगृहात ते बोलत होते.

दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया प्रमुख पाहुणे होते कोकण विभागातर्फे नवी मुंबई, ठाणे, पनवेल,कल्याण-डोंबिवली, मीरा भायंदर, वसई-विरार, उल्हासनगर, बदलापूर-अंबरनाथ, रायगड, वांगणी आदी क्षेत्रातील कार्यकर्ते यांचा मेळावा झाला.नवी मुंबई कार्यकारी अध्यक्ष श्याम कदम यांच्या टीमने या मेळाव्याचे आयोजन केले होते.यावेळी स्वागत खास मराठी तुतारीने करण्यात आले.

यावेळी आप राष्ट्रीय कार्यकारणी तसेच महाराष्ट्र कार्यकारणीचे सदस्यांनी सर्वसामान्य माणसांना आज भेडसावणाऱ्या विविध जनताभिमुख विषयांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यात सरकारी शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था, माहिती अधिकार, सामाजिक न्याय, सरकारी निमसरकारी उद्योगाच्या खाजगीकरणाचा सुरु झालेला अतिरेक, ढासळलेली आरोग्य व्यवस्था, महिला सुरक्षा, नागरी सुरक्षा, कामगार-कष्टकरी व शेतकरी यांचे प्रश्न, भ्रष्टाचार, प्रस्थापितांचा भ्रष्ट राज्य कारभार अशा विविध विषयांवर भूमिका मांडली.

यावेळी दिल्लीच्या आमदार अतिशी सिंग यांनी, उत्कृष्ट सरकारी शिक्षण व्यवस्था कशी असावी यावर मार्गदर्शन केले. तसेच आमदार कुलदीप कुमार यांनी, दिल्ली महापालिकेमधील विजयाची यशोगाथा सांगून सुरत महापालिका निवडणुकीत आपला २७ जागा मिळाल्या असे सांगितले.

मेळाव्याला महाराष्ट्र प्रभारी दीपक सिंघला, महादेव नाईक, मुंबई अध्यक्षा श्रीमती प्रीती शर्मा- मेनन, किशोर मांध्यान, राज्य उपाध्यक्षधनराज वंजारी, उपाध्यक्ष व हरिभाऊ राठोड, राज्यसचिव धनंजय शिंदे, संघटन मंत्रीविजय कुंभार यासह कोकण विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

कारगिल युद्धाच्या शौर्यकथांनी डोंबिवलीकरांचे पाणावले डोळे

सुभेदार मेजर योगेंद्र सिंह यांनी मुलाखतीतून युद्धभूमी आणली समोर

डोंबिवली : पुढारी वृत्तसेवा

भारताच्या सर्वोच्च शौर्य पुरस्काराने अर्थात परमवीर चक्राने गौरविण्यात आलेले सुभेदार मेजर तथा मानद कॅप्टन योगेंद्र सिंह यादव यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम डोंबिवलीत पार पडला. यावेळी भारतीय सैनिक असलेले सुभेदार मेजर तथा मानद कॅप्टन योगेंद्र सिंह यांनी प्रकट मुलाखतीतून युद्धभूमी आणली समोर आणली. त्यांच्या शौर्य कथा ऐकून नतमस्तक होतानाच उपस्थित डोंबिवलीकरांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या.

श्री गुरुदत्त सोसायटीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पुण्याच्या असीम फाऊंडेशन आयोजित राष्ट्र आराधनच्या पाचव्या पुष्पामध्ये टायगर हिलची लढाई या कार्यक्रमाचे आयोजन नीलपद्म सभागृहात करण्यात आले होते. असीम फाऊंडेशनचे सारंग गोसावी यांनी प्रचंड संख्येने उपस्थित डोंबिवलीकरांच्यावतीने योगेंद्र सिंह यांच्याशी संवाद साधला.

यावेळी कडाक्याची थंडी, प्रचंड वेगाने वाहणारे वारे, बर्फाचे थर व शत्रूच्या आग ओकणाऱ्या तोफा आणि बंदुकांची पर्वा न करता भारतीय सैन्याने टायगर हिल हे महत्वाचे ठाणे पाकिस्तानी घुसखोरांकडून परत कसे मिळवले, याची रोमांचक कहाणी योगेंद्र सिंह यादव यांनी सांगितली.

सैन्यात असणाऱ्या आपल्या वडिलांच्या शौर्य कथांनी प्रेरित होऊन, शाळेत असताना अवघ्या आठव्या इयत्तेपासून सैन्यात जाण्याचा ध्यास घेतलेले योगेंद्र सिह केवळ १६ वर्षे ५ महिने इतक्या कोवळ्या वयात सैन्यात दाखल झाले. पाकिस्तानी घुसखोर द्रास आणि कारगिलच्या भागात उंचीच्या ठाण्यांवर कब्जा करून बसल्याचे आपल्या सैन्याला कळताच कारगिल युद्धाचा बिगुल वाजला. अवघ्या अठरा वर्षाचे योगेंद्र सिंह आपल्या १८ ग्रेनेडीयर्सच्या सहकाऱ्यांसह युद्धात उतरले. लेह-श्रीनगरच्या महामार्गावर नियंत्रण मिळवण्यासाठी पाकिस्तानने टायगर हिल हे मोक्याचे ठाणे काबीज केले होते. ते परत मिळवण्याची जबाबदारी इतर काही तुकड्यांबरोबर योगेंद्र सिंह यांच्या तुकडीला देण्यात आली.

सुरुवातीचे काही दिवस टायगर हिलच्या आजूबाजूची मोक्याची ठाणी मिळवणाऱ्या सहकाऱ्यांना शिबंदी पुरवण्याची अतिशय आव्हानात्मक जबाबदारी योगेंद्र यांना देण्यात आली होती. शत्रूच्या गोळीबाराची पर्वा न करता अक्षरशः दिवस-रात्र चालून त्यांनी ती प्रामाणिकपणे पार पाडली. यावेळेचा दिसून आलेला फिटनेस आणि त्यांचा मानसिक कणखरपणा लक्षात घेऊन प्रत्यक्ष टायगर हिलवर करण्याच्या चढाईमध्ये त्यांना घातक तुकडीत (हल्ल्याच्या आघाडीवरची तुकडी) सामील करण्यात आले. सलग ४८ तास रात्री रांगत रांगत पुढे जाणे आणि दिवसा शत्रूच्या तीक्ष्ण नजरेपासून जपून सुरक्षित राहणे, असे मार्गक्रमण करत १५ जणांची ही तुकडी अवघ्या काही मीटर्सपर्यंत येऊन पोहोचली. दुर्दैवाने यावेळी शत्रूच्या नजरेत आल्यामुळे या तुकडीवर प्रचंड गोळीबार सुरु झाला, ज्यामुळे आघाडीचे ७ सैनिक एकटे पडले. अशावेळी माघार न घेता लढाऊ बाण्याच्या आपल्या सैनिकांनी थेट आक्रमण करण्याचे ठरवले. शत्रूच्या तिखट प्रतिकाराला तोंड देताना योगेंद्र सिंह यांचे सहकारी एकेक करत मृत्युमुखी पडले. त्यांना स्वतःला सुद्धा अनेक गोळ्या लागल्या.

अशा अवघड परिस्थितीत अतिशय शांत डोक्याने त्यांनी शत्रूच्या तुकडीला आपण मेल्याचे भासवून मग अचानक हल्ला चढवला. गोळीबारामुळे डावा हात शरीरापासून विलग झालेला असतानाही त्यांनी अतुलनीय शौर्याचे प्रदर्शन करून शिल्लक पाकिस्तानी सैन्यास माघार घेण्यास भाग पडले. शत्रूच्या पुढच्या ठाण्यावर यापेक्षा जास्त शिबंदी आणि माणसे आहेत, हे लक्षात घेऊन योगेंद्र सिंह संपूर्ण जायबंदी अवस्थेत फक्त मनाच्या बळावर रांगत आपल्या तुकडीपर्यंत पोहोचले. प्रचंड रक्तस्त्रावामुळे ते कमजोर झाले होते. परिणामी त्यांना दिसायचेही बंद झाले. पण अशाही परिस्थितीत आपल्या कमांडिंग ऑफिसरला चकमकीची संपूर्ण माहिती देऊन शत्रूच्या तयारीचा अंदाज देऊनच ते बेशुद्ध झाले. त्यांच्या वेळेवर मिळालेल्या माहितीमुळे भारतीय सैन्याने त्याच रात्री टायगर हिलचे ठाणे घुसखोरांपासून मुक्त केले.

अवघ्या १९ व्या वर्षी सर्वोच्च पुरस्कार

या अतुलनीय कामगिरीसाठी वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. योगेंद्र सिह यांच्याकडून या आठवणी ऐकताना उपस्थित सर्व भारावून गेले होते. या रोमांचकारी शौर्य कथांनी आपणही देशासाठी काहीतरी करावे, ही स्फूर्ती नव्या पिढीला मिळावी, अशी माफक अपेक्षा योगेंद्र सिंह यांनी व्यक्त केली.हे देशाचे काम आहे अशा कर्तव्य भावनेने सर्व आयोजकांनी या कार्यक्रमासाठी काम केले. डोंबिवलीकर नागरिकांनीही याला उस्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचा शेवट फक्त सामूहिक वंदे मातरम् गायनाने करण्यात आला.

पोलिसांच्या समस्यांसाठी जिल्हास्तरावर तक्रार पेटी लावा

गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

पोलिसांच्या समस्या मार्गी लागण्यासाठी प्रत्येक जिल्हयातील पोलीस आयुक्त व अधीक्षक कार्यालयात'गृहमंत्री तक्रार निवारण पेटी' लावावी तर मंत्रालयात'तक्रार निवारण कक्ष' सुरु करावा. महाराष्ट्र पोलीस परिवार व पोलीस मित्र न्याय हक्क संघर्ष समितीने गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ही मागणी केल्याची माहिती समितीचे कार्याध्यक्ष नीलेश नागोलकर यांनी दिली.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये पोलीस आयुक्त कार्यालय व पोलीस अधीक्षक कार्यालयात गृहमंत्री तक्रार निवारण पेटी लावावी. जेणेकरुन; पोलीस नाईकपासून पोलीस उपायुक्त पर्यंत प्रत्येक जण पोलीस खात्यामध्ये कार्य करताना भेडसावणाऱ्या समस्या आपल्यापर्यंत पोहोचू शकेल. तसेच या सर्व समस्यांचा निपटारा करण्यासाठी मंत्रालयात 'गृहमंत्री तक्रार निवारण कक्ष ' उघडण्यात यावा. गृहखात्याचे कार्य अधिक सक्षमतेने भयमुक्त व चिंतामुक्त व्हावे, हा यामागे उद्देश आहे.

वर्षानुवर्षापासून पोलीस खाते हे ब्रिटिश कालीन कायद्यावर सुरु आहे अनेक कायदे हे जुने झाले आहेत. पोलीस दल अति महत्त्वाचे असूनही त्यांचे अनेक प्रश्न 'आ' वासून उभे आहेत. अनेक गृहमंत्री होऊन गेले. पण; प्रत्यक्ष पोलिसांसाठी जे काम व्हायला पाहिजे ते अजूनही पूर्णपणे झाले नाही. असेही निवेदनात म्हटले आहे.

मुंबई विद्यापीठ

क्र. संलग्नता/मान्यता/आयसीडी/२०२३-२४/०१

जाहिरात

मुंबई विद्यापीठ परिक्षेत्रात नवीन महाविद्यालये व नवीन विद्याशाखा / अभ्यासक्रम/ विषय/अतिरिक्त तुकड्या (पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरिता) तसेच सेटलाईट केंद्र सुरु करण्याकरिता इच्छुक शैक्षणिक संस्था / महाविद्यालयांकडून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ व उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण २०२२/प्र. क्र. ७०/विशि ५ दिनांक ७ जानेवारी, २०२३ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता विद्यापीठाच्या बृहत आराखड्यास महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या मंजुरीनुसार फक्त ऑनलाईन (online) पद्धतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा बृहत आराखडा, शासन निर्णय, महाराष्ट्र शासन राजपत्र, शासन पत्र, शुल्क परिपत्रक, प्रस्ताव मार्गदर्शिका (Proposal Guidelines) सविस्तर माहिती विद्यापीठाच्या https://muonline.org.in या संकेतस्थळावरील Downloads लिंकमध्ये उपलब्ध करण्यात आलेली आहे.

ऑनलाईन प्रस्ताव सादर केल्यानंतर सदर प्रस्तावांच्या तीन प्रती (Hard Copy) व पायाभूत सुविधांच्या चित्रीकरणाची संगणक चक्ती (Video C.D.) **दिनांक १५ जानेवारी, २०२३ सायंकाळी ५ वा. पूर्वी महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग, कक्ष क्र. २०७, दुसरा मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०००३२ येथे दुसरा व चौथा शनिवार, रविवार आणि इतर सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त स्वीकारले जातील.** सदर नमूद केलेल्या दिनांक व वेळेनंतर येणारे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही. तसेच बृहत आराखड्यातील स्थळबिंदू बाहेरील नवीन महाविद्यालयासाठी सादर केलेल्या प्रस्तावांचा कोणताही विचार केला जाणार नाही व त्याअनुषंगाने भरलेले शुल्क परत केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई - ४०० ०३२.
०८, जानेवारी, २०२३

-स्वा.-
(प्रो. सुनिल भिरूड)
प्र. कुलसचिव

रेल्वे रुळांना तडे जाण्याच्या घटनांमध्ये घट

मुंबई : सुरेखा चोपडे

हवामानातील बदलामुळे रेल्वे रुळांना तडे जाण्याच्या घटना वारंवार घडतात. परंतु गेल्या काही वर्षापासून रेल्वे प्रशासनाने रुळांच्या देखभाल-दुरुस्तीवर जास्त भर दिला आहे.तसेच आधुनिक पद्धतीने रुळांची देखभाल केली जात असल्याने रुळांना तडे जाण्याच्या घटनांमध्ये घट झाली आहे. मध्य रेल्वेवर एप्रिल ते डिसेंबर या नऊ महिन्यात फक्त १२ वेळा रुळांना तडे गेल्याच्या घटनांची नोंद आहे.

टाळेबंदीपूर्वी उपनगरीय रेल्वे मार्गावरुन रोज तब्बल ८० लाख प्रवासी प्रवास करत होते. मध्य,पश्चिम आणि हार्बर मार्गावर दिवसाला लोकलच्या ३ हजार फेऱ्या होत होत्या. उन्हाळ्यात प्रसरण तर हिवाळ्याने आकुंचन पावल्याने रुळाला तडे जातात.रुळाला तडे गेले की लोकलची वाहतूक सुमारे एक ते दीड तास कोलमडते.त्यामुळे प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागतो. परिणामी रेल्वे प्रशासनाने रुळाला तडे जाण्याच्या घटना शून्यावर आणण्यासाठी गेल्या काही वर्षापासून दुरुस्तीवर विशेष लक्ष दिले जात आहे. त्यासाठी दर रविवारी ब्लॉक घेतला जातो

रेल्वेने ब्लॉस्ट क्लिनिंग, डिओमॅटिक टॅम्पिंग आणि ट्रक रिलिंग यंत्राच्या सहाय्याने रुळांची स्थिती सुधारली आहे.

हरवलेला ऐवज प्रवासी महिलेस परत

डोंबिवली : पोलिस ठाण्याचे अंमलदार नितीन सांगळे आणि शिवाजी राठोड यांनी रिक्षात विसरलेली पर्स जशीच्या तशी एका प्रवासी महिलेस मिळवून दिली. मानपाडा येथील भागाशेठ हाईट्समधील उर्मिला गौरीशंकर गुप्ता (६०) यांनी यासंदर्भात पोलिसांत तक्रार दाखल केली होती. श्रीक्षेत्र पिंपळेश्वर महादेव मंदिर ते डोंबिवली रेल्वे स्थानकादरम्यान रिक्षातून प्रवास करत असताना उर्मिला यांची पर्स रिक्षात विसरली.सपोनि योगेश सानप यांच्या मार्गदर्शनाखाली नितीन सांगळे व शिवाजी राठोड यांनी तांत्रिक मदतीआधारे शोध घेऊन हरविलेली पर्स व २ तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र ताब्यात घेतले.

A BRAND OF RAJNISH WELLNESS LIMITED
आपल्या वैवाहिक जीवनात भरा एक जोशपूर्ण जाणीव
फक्त पुरुषांसाठी
प्ले-विन
100% आयुर्वेदिक
तेल कॅप्सूल
चांगल्या परिणामांसाठी प्ले-विन तेलाचाही वापर करा.
सर्व मेडिकल/आयुर्वेदिक स्टोअर्स मध्ये उपलब्ध
Buy Online : www.davadiscount.in

एल&टी फायनान्स लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: 15वा मजला, पीएस श्रीजन टेक पार्क, प्लॉट नं. 52, ब्लॉक डीएन, सेक्टर V, सॉल्ट लेक सिटी कोलकाता 700 091, जिल्हा 24-परगणा उत्तर.
CIN No.: U65910WB1993FLC060810
शाखा कार्यालय: मुंबई

L&T Financial Services

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रचना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक लिलावाद्वारे'' ''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 05.01.2023 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. अनंत साबू कोडियोट्टिल (मृत कर्जदार साबू सदाशिवन कोडियोट्टिल ह्यांचे कायदेशीर वारसदार आणि सह-कर्जदारही) 2. हिनाम्मा साबू कोडियोट्टिल (मृत कर्जदार साबू सदाशिवन कोडियोट्टिल ह्यांचे कायदेशीर वारसदार आणि सह-कर्जदारही) 3. फोरस ऑफशोअर सर्व्हिसेस	मालमत्तेचा पत्ता-फ्लॅट नं. 1802, 18 वा मजला, क्षेत्रफळ अंदाजे 1070 चौरस फिट, चटई क्षेत्रफळ आणि दोन स्टिल्ट कार पार्किंग क्षेत्रफळ 882 चौरस फिट, जे 'सी पॅलेस' नावाच्या इमारतीमध्ये आहे जी गाव प्लॉट नं. 2, 2A, 11 ते 17, सेक्टर 36, पाम बीच रोड, करावे नेरूळ नवी मुंबई, महाराष्ट्र-400706, ज्याच्या सीमा अशा: पूर्व: एवरीडे बिल्डिंग पश्चिम: सी होम प्लेस उत्तर: पोद्दार इंटरनॅशनल स्कूल दक्षिण: पाम बीच रोड	MUMHL130 00629	10 ऑक्टोबर, 2022	रु.36,77,487.9	रु.31,216,874.46	रु.3,67,74,879/-	18/01/2023	25/01/2023

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **24/01/2023** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **31/01/2023** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **01/02/2023** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - सनील निकम, संपर्क क्रमांक - 8424870093 पत्ता: एल&टी फायनान्स लि.- ऑफिस: 6वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400098, आणि अंकीत विग, संपर्क क्रमांक - 8668943242, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, वृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400098.** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करू शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 10.01.2023
ठिकाण: मुंबई

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

यूनियन बँक ऑफ इंडिया Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय, मुंबई वाशी,
रुपा सफायर , ३ रा मजला, सायन पनवेल हाईवे, प्लॉट क्रमांक १२ सेक्टर १८ वाशी - ४००७०५

जाहीर सूचना

यूनियन बँक ऑफ इंडिया- मुंबई वाशी क्षेत्रीय कार्यालयाचे स्थलांतर

क्षेत्रीय कार्यालय मुंबई वाशी हे पूर्वी २ रा मजला कोरल स्क्वेअर, घोडबंदर रोड, सुरज वॉटर पार्क समोर, ठाणे पश्चिम ४००६१५ पत्त्यावरून कार्यरत होते ते आता रुपा सफायर , ३ रा मजला, सायन पनवेल हाईवे, प्लॉट क्रमांक १२ सेक्टर १८ वाशी - ४००७०५ या नवीन पत्त्यावर स्थलांतरित करण्यात आले आहे. यूनियन बँक ऑफ इंडियाच्या ग्राहक/विक्रेते आणि जनतेला /आता फक्त खालील पत्त्यावर भेट देण्याची आणि संपर्क करण्याची विनंती केली जाते :-

यूनियन बँक ऑफ इंडिया क्षेत्रीय कार्यालय मुंबई वाशी चा नवीन पत्ता

क्षेत्रीय कार्यालय मुंबई वाशी
रुपा सफायर , ३ रा मजला, सायन पनवेल हाईवे, प्लॉट क्रमांक १२ सेक्टर १८ वाशी - ४००७०५
संपर्कासाठी तपशील : +९१ २२ ४६०७८०३९, +९१ २२४६०७८९१५
ईमेल :pnd.romumbaivashi@unionbankofindia.bank

स्थान : नवी मुंबई
तारीख: ०९.०१.२०२३

क्षेत्रीय प्रमुख,
क्षेत्रीय कार्यालय, मुंबई वाशी

KHUSH HOUSING FINANCE

खुश हौसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: ८१०, औरा बायप्लेक्स, एस व्ही रोड, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२. वेबसाईट: www.khfl.co.in

स्थावर मालमत्तांची लिलाव विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ अन्वये स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता लिलाव विक्री सूचना

सर्वसामान्य जनता आणि विशेषतः कर्जदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नउल्लेखित स्थावर मालमत्ता या खुश हौसिंग फायनान्स प्रा. लि. यांच्याकडे गहाणवट/प्रभारित आहेत. ज्यांचा सांकेतिक ताबा प्रतिभूती धनको म्हणून खुश हौसिंग फायनान्स प्रा. लि. (केएचएफएल) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या खालील नमूद तपशिलानुसार "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "तेथे जे आहे तत्वावर आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्वावर" विक्री करण्यात येणार आहेत.

सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेन्ट विनियमन, २००२ च्या नियम ८(६) आणि ९ अन्वये जशी बाब असे तसे कर्जदार/गहाणवटदारकर्जदार/गहाणवटदारा(रां)चे निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिनी यांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

कर्ज खाते क्र.- LXBOR02717-180002604
कर्जदार/जामीनदारांचे नाव -
(१) मे. अथर्व डेव्हलपर्स
(२) श्री. दीपक अंबालाल शाह
(३) सौ. अचला दीपक शाह

एकूण थकबाकी रक्कम - दि. ०१.०१.२०२३ रोजी नुसार रु. १८,५२,४५,५२०/- (सर्व वसुली आणि कायदेशीर खर्च वगळता) पुढील व्याज आणि प्रभारांसह)

सांकेतिक ताब्याचा दिनांक - दि. २८ ऑक्टोबर, २०२२

गहाणवट मालमत्तांचे वर्णन- पोदार रोड, मालाड पूर्व, मुंबई ४०००९७ येथे स्थित सीटीएस क्र. ३४८ धारण केलेल्या प्लॉटच्या भागावर स्थित कोशा कमर्शियल कॉम्प्लेक्समधल विंग-ए मधील २९ (एकोणतीस) वाणिज्य युनिट्स/कार्यालये.

अ.क्र.	युनिट	मजला	स्तर	रेरा सीए चौ. फू.मध्ये	राखीव किंमत	बांधकामाचा टप्पा
१	५	तळ	तळ	२३८.९६०८	रु. ८३,६४,०००	८५%
२	१२	तळ	तळ	२८८.६९०५	रु. १,०१,०४,०००	८५%
३	१३	तळ	तळ	२८८.६९०५	रु. १,०१,०४,०००	८५%
४	१	पहिला	१ला	२८८.६९०५	रु. ८०,८३,०००	९५%
५	२	पहिला	१ला	२८८.६९०५	रु. ८०,८३,०००	९५%
६	३	पहिला	१ला	२८८.६९०५	रु. ८०,८३,०००	९५%
७	१४	पहिला	१ला	२८८.६९०५	रु. ८०,८३,०००	९५%
८	१५	पहिला	१ला	२८८.६९०५	रु. ८०,८३,०००	९५%
९	७	दुसरा	२रा	२८८.६९०५	रु. ८०,८३,०००	९०%
१०	८	दुसरा	२रा	२८८.६९०५	रु. ८०,८३,०००	९०%
११	९	दुसरा	२रा	२४७.७८७३	रु. ६९,३८,०००	९०%
१२	१०	दुसरा	२रा	२४६.२८०३	रु. ६८,९६,०००	९०%
१३	११	दुसरा	२रा	२८८.६९०५	रु. ८०,८३,०००	९०%
१४	१	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
१५	२	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
१६	३	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
१७	४	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
१८	५	सहावा	१०वा	२९६.७६३५	रु. ७४,११,०००	७५%
१९	६	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
२०	७	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२ १७ ०००	७५%
२१	८	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
२२	९	सहावा	१०वा	२४७.७८७३	रु. ६१,९५,०००	७५%
२३	१२	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
२४	१३	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
२५	१४	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
२६	१५	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
२७	१६	सहावा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
२८	१५	नववा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%
२९	१६	नववा	१०वा	२८८.६९०५	रु. ७२,१७,०००	७५%

वरील संपत्ती / मालमत्तांच्या लिलाव विक्रीकरिता सदर जाहीर सूचनेपुढे (सरफैसी, कायदा २००२ च्या अटी आणि शर्ती आणि त्याअंतर्गत नियमांमध्ये) केएचएफएल सदर मालमत्तांच्या खरेदीकरिता मोहोरबंद पाकिटांमध्ये प्रस्ताव मागवित आहे. लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत:

१. उपरोल्लेखित मालमत्ता वर नमूद केलेल्या राखीव किंमतीच्या खाली विक्री करण्यात येणार नाहीत.
२. इच्छुक बोलीदारांनी वरील उल्लेखित राखीव किंमतीच्या १०% इसारा रक्कम अनामत (ईएमडी) खुश हौसिंग फायनान्स प्रा. लि.च्या नावे डिमाण्ड ड्राफ्ट /ऑनलाईन भरणा या मार्गे जमा करण्याची विनंती आहे.
३. सदर ठेव/ठेवी यशस्वी बोलीदाराच्या प्रकरणात समायोजित केल्या जातील, अन्यथा परत केल्या जातील. सदर इसारा रक्कम अनामतीवर कोणतेही व्याज देण्यात येणार नाही.
४. उपरोल्लेखित इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सह प्रस्ताव मोहोरबंद पाकिटातून, ज्यावर मालमत्तेच्या खरेदीकरिता प्रस्ताव असे लिहिलेले असेल, सादर करावे आणि ते **खुश हौसिंग फायनान्स प्रा. लि. यांच्या नोंदणीकृत कार्यालय - ८१०, औरा बायप्लेक्स, एस. व्ही. रोड, बोरीवली (पश्चिम) - ४०००९२** येथील कार्यालयात **दि. ०३.०१.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी** पोहोचावयास हवे.
५. की, निविदा उघडल्यानंतर इच्छुक बोलीदार ज्यांनी त्यांच्या बोली राखीव किंमतीपेक्षा कमी सादर केलेल्या नाहीत, त्यांना प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीमध्ये बोली रक्कम वाढविण्याची संधी दिली जाईल.
६. निम्नस्वाक्षरीकार यांना प्राप्त झालेले प्रस्ताव / निविदा दि. ३०.०१.२०२३ रोजी स. ११.०० वा. उपस्थित बोलीदारांसमक्ष "८१०, औरा बायप्लेक्स, एस. व्ही. रोड, बोरीवली (पश्चिम) - ४०००९२" या ठिकाणी उघडण्यात आणि विचारात घेण्यात येतील.
७. यशस्वी बोलीदारांनी विक्रीच्या संदर्भात प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे प्रस्ताव स्वीकारल्यानंतर तात्काळ, आधीच भरलेली ईएमडी समायोजित करुन, विक्री किंमतीच्या रक्कमेच्या २५% रक्कम जमा करावी, असे न केल्यास जमा केलेली इसारा रक्कम जप्त केली जाईल. विक्री किंमतीचा उर्वरित ७५% रक्कम प्राधिकृत अधिकाऱ्याच्या संपूर्ण अखत्यारीत विक्री निश्चितीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत देय असेल. उर्वरित रक्कम विहीत कालावधीमध्ये जमा करण्यास अयशस्वी ठरल्यास जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल.
८. यशस्वी बोलीदार/रांनी सर्व "थकीत देणी म्हणजेच, महापालिका कर, वीज प्रभार, पाणी शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, विक्री कर (जर लागू असल्यास), जर असल्यास आणि इतर प्रासंगिक शुल्क, सदर मालमत्तेशी संबंधित विक्री किंमत व्यतिरिक्त सर्व देणी समाविष्ट असलेले शुल्क" भरावयाची आहेत.
९. प्राधिकृत अधिकाऱ्यास उच्चतम प्रस्ताव किंवा कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे बंधनकारक नाही आणि कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न दर्शविता स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत.
१०.निविदा अर्ज किंवा इतर माहिती निम्नस्वाक्षरीकारांच्या कार्यालयातून कामकाजाच्या कोणत्याही दिवशी प्राप्त करता येईल/उपलब्ध करून देण्यात येईल.
११. आजच्या दिनांकापर्यंत वरील स्थावर मालमत्ता/तारण संपत्ती विक्री करणे, हस्तांतरित करणे आणि/किंवा समायोजित करणे यापासून केएचएफएल/केएचएफएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्यास प्रतिबंधित करणारा कोणताही आदेश नाही आणि/किंवा न्यायालयीन मनाई हुकूम नाही.
१२. कर्जदार/विकासक यांनी वरील सुविधा स्तर १० वरील ६ व्या मजल्यावरील वाणिज्य युनिट क्र. ६०१, ६०२ आणि ६१६ वर केएचएफएलच्या पूर्व परवानगी किंवा मंजुरीशिवाय तृतिय पक्ष हक्क बनविले आहेत. तथापि, असे हक्क कायद्याने बेकायदेशीर आहेत आणि ती कृती कायद्यानुसार दंडनीय आहे.
१३. इच्छुक बोलीदार वैयक्तिक युनिटकरिता देखील बोली लावू शकतात.
१४. संभाव्य खरेदीदार/बोलीदार आणि इच्छुक पक्षकार निविदा/बोली अर्ज सादर करण्यापूर्वी किंवा प्रस्ताव देण्यापूर्वी केएचएफएलकडे उपलब्ध असलेल्या सदर मालमत्तांच्या शीर्षक कागदपत्रांची स्वतंत्ररित्या पाहणी करु शकतात आणि सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करु शकतात.
१५. कोणत्याही माहितीकरिता कृपया श्री. अजित साळुंके (कायदे प्रमुख) - ९८६३२७१६८४ यांना संपर्क साधावा.

दिनांक: ०९.११.२०२३
ठिकाण: मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी
खुश हौसिंग फायनान्स प्रा. लि.